## ५. निवडणूक प्रक्रिया

**मतदाराच्या वर्तनाला प्रभावित करणारे घटक :**

लोकशाही निवडणूका आणि मतदाराचे वर्तन यांना विशेष महत्व असते निवडणूकीच्या स्वरुपात व तंत्रात दिवसेंदिवस बदल होत आहे या बदलाचा परिणाम मतदाराच्या वर्तनावर होतो. राज्यघटनेने 18 वर्ष पूर्ण करणाऱ्या प्रत्येक नागरीकाला मतदानाचा अधिकार दिला. या अधिकारामुळे राजकीय सहभागाची संधी प्राप्त झाली. या संधीमुळे लोकशाही व्यवस्था अधिक बळकट झाली. भारतीय राज्यघटनेने मतदानाच्या माध्यमातून दिलेल्या राजकीय सहभागाच्या संधीचा वापर सर्वच नागरीकांनी योग्य पद्धतीने केला नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया व्यवहार यांच्या वर्तना बाबत शंका निर्माण झाली. काही अभ्यासकांच्या मते भारतीय मतदार स्वतः च्या सद्सद विवेक बुद्धीने मतदान करत नाही याचा अर्थ भारतीय मतदाराच्या वर्तनाला प्रभावित करणारे काही घटक आहेत या घटकांचा फार मोठा प्रभाव मतदाराच्या वर्तनावर पडतो.

निवडणूका मग त्या स्थानिक असो की राष्ट्रीय महाविद्यालय असो की विद्यापीठीय प्रत्येक क्षेत्रातील निवडणूक मग त्यात सहभागी होणाऱ्या मतदारावर काही घटक आपला प्रभाव टाकत असतात. मतदाराच्या वर्तनाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा उल्लेख खालील प्रमाणे करता येतो.

1) जात :

भारतीय नागरीकांच्या सामाजिक संबंधाचा जात हा महत्वपूर्ण घटक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीचे राजकीकरण आणि राजकारणातील

जात या दोन्ही बाबी प्रभावीपणे जाणवतात. उदा.:
उमेदवारांची निवड करण्यासाठी जातीचा आधार
घेतला जातो. जातीच्या आधारे मतदार संघाची बांधणी
होते. जातीच्याच उमेदवाराला मतदान केले जाते.
मंत्रीपद देताना ही जातीचा विचार होतो. राजकीय
पक्षाची स्थापनाही जातीच्या आधारेच होते. स्थानिक निवडणु
कीपासून ते विधानसभेपर्यंत जात या घटकाने मतदाराचे
वर्तन आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला प्रभावित केले
आहे.

2) धर्म :
संविधानानुसार भारत हा देश धर्मनिरपेक्ष आहे.
परंतु भारतीय जनता धर्मनिरपेक्ष नाही या विधानामध्ये
बरीच सत्यता आहे. कारण भारतातील अनेक राजकीय
पक्ष आणि सामाजिक संघटना विशिष्ट धर्माच्या संरक्षणा-
साठी निर्माण झालेल्या दिसतात या सर्वांमार्फत निवडणुकी-
च्या वेळी मतदारांच्या धार्मिक भावनांना आव्हान केले
जाते विविध धर्मीय संस्था संघटना धर्मगुरु यांचा ही
भारतीय राजकारण व मतदारावर प्रभाव दिसतो म्हणून
धर्म हा मतदाराच्या वर्तनाला प्रभावित करणारा घटक
आहे हे स्पष्ट होते.

3) व्यक्तिमत्व :
स्वातंत्र्यनंतरच्या काळात पंडित नेहरू, इंदिरा गांधी
नरेंद्र मोदी या राजकीय व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडतो
अधिक जाणवतो पक्षीय संघटन, शासन रचना आणि
निवडणुका या सर्वच पातळ्यावर या व्यक्तीमत्वांचा
प्रभाव दिसून येतो महाराष्ट्रातील मतदारांच्या वर्तनावर

यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, राज ठाकरे इत्यादी व्यक्तीमत्वाचा प्रभाव जाणवतो या व्यक्तीमत्वाच्या प्रभावामुळे पक्षाला जनाधार मिळतो.

उदा :- २०१४ ची लोकसभा निवडणूक आणि नरेंद्र मोदी, गुजरात विधानसभा निवडणूक 2017 आणि नरेंद्र मोदी

4) पैसा :-

भारतीय राजकारणावर निवडणुकीच्या काळात बरेच उमेदवार मतदारांना पैसे देऊन मत विकत घेतात हे सर्वमान्य असलेले उघड गुपीत आहे. पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी व निवडणूक जिंकून येण्यासाठी प्रचंड पैसा निवडणुकीच्या काळात वापरला जातो मतदानासाठी पैसे मंदिर मशीद बांधण्यासाठी पैसे इतर सामाजिक उपक्रमासाठी पैसे देऊन प्रलोभन (लालच) दिले जाते.

5) प्रदेश :- वादाची भावना :-

स्वातंत्र्यापासून आजपर्यंत अनेक मुद्द्यांनी भारतीयांच्या अस्मितेला आव्हान दिलेले आहे.
उदा :- जमात वाद, प्रदेश वाद, वंश आणि बहु विविधता या सर्वांचा परिणाम म्हणून स्वतंत्र राज्य निर्मिती राज्यांना अधिक स्वायत्तता मिळावी आणि आपल्या राज्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण व्हावे. आपल्या प्रदेशासह प्रादेशिक भाषा संस्कृती व मुल्य या सर्वांच्या संरक्षणासाठी राजकारण केले जाते. या सर्वांमध्ये दक्षिणेकडील राज्य अधिक अग्रेसर

असतात. लोकांच्या प्राथमिक अस्मिता त्यांच्या प्रदेशाशी निगडीत असल्यामुळे प्रादेशिक भावनेचे प्रतिबिंब भारतीय राजकारणात दिसून येते.

6) पक्षनिष्ठा :-
भारतीय मतदारांच्या वर्तणुकीला प्रभावित करण्यात पक्षनिष्ठा याचा महत्त्वाचा वाटा असतो. विशिष्ट राजकीय ~~पक्षाशी~~ पक्षाशी बांधीलकी असणारे लोक / मतदार त्या पक्षाच्या कोणत्याही कृतीला / विचार ला / धोरणाला पाठींबा देतात.
उदा.:- 1977 साली काँग्रेसची स्थिती बिकट असताना ही 34.5% मतदारांनी काँग्रेसला मतदान केले होते.
पक्षनिष्ठा राष्ट्रहिताची नसते पक्षनिष्ठा मतदानाच्या अधिकारावर मर्यादा आणणारी असते पक्षनिष्ठेमुळे योग्य उमेदवार निवडून येण्याची शक्यता फार कमी असते. तरीही भारतीय मतदार मतदान करताना भावनिक होऊन विचार करतो.

7) तत्कालीन परिस्थिती :-
मतदारांचे अचानक बदलणारे वर्तन मुख्यतः तत्कालीन स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून असते. यातही प्रामुख्याने राजकीय आणि आर्थिक घटना मतदारांच्या वर्तनाला प्रभावित करतात.
उदा.:- 1975 च्या आणिबाणीमुळे 1977 साली काँग्रेसची सत्ता गेली. नैसर्गिक किंवा मानवी आपत्ती, भाववाढ, असुरक्षितता, नोटबंदी, GST इत्यादी मुद्द्यांचा प्रभाव ने मतदारांचे वर्तन बदलते.

8) निवडणुकीतील प्रचार :-

निवडणूकीच्या काळात प्रत्येक राजकीय पक्ष मतदारांनी आपल्यालाच मतदान करावे यासाठी प्रचाराची साधन वापरतात. या प्रचारात मोठ्या जनसभा, पत्रके, व्यक्तीगत संवाद, बॅनर्स, वर्तमानपत्रे, जाहीराती, दूरदर्शन, सोशल मिडिया इत्यादी साधनांचा वापर केला जातो. या सर्वांच्या प्रभावामुळे मतदारांच्या वर्तनावर परिणाम होत असतो. निवडणूक प्रचारात वरील सर्व साधनांचा वापर करुन होणाऱ्या जाहीरातीमुळे मतदाराचे वर्तन प्रभावित होते.

9) प्रसार माध्यमे :-

निवडणूकीच्या काळात जनमत तयार करण्यामध्ये आणि मतदारावर प्रभाव टाकण्यामध्ये सर्व प्रकारची प्रसार माध्यमे महत्त्वाची भुमिका बजावतात. या प्रसार माध्यमामध्ये दृकश्राव्य, प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक व सोशल मिडियाचा वापर प्रसार माध्यमाकडून होतो. निवडणूकीच्या काळात प्रसार माध्यमामुळे पोषक किंवा घातक वातावरणाची जाणीवपूर्वक निर्मिती केली जाते या वातावरणाचा परिणाम मतदाराच्या वर्तनावर होतो. म्हणून निवडणूकपूर्व व निवडणूक नंतरच्या जनमत चाचण्यावर बंदी आणावी अशी मागणी होत आहे.

10) सरकार विरोधी भावना :-

सत्ताधारी पक्षाने आपल्या जाहीरनाम्यामध्ये दिलेली आश्वासने पूर्ण केलेली नसतील. सत्ताधारी पक्षाची कारकीर्द सर्वच घटकासाठी समाधानकारक नसेल, सत्ताधारी पक्षाची कामगिरी व तिचा दर्जा खालावलेला असेल. सत्ताधारी

पक्षाच्या कामकाजाविषयी सर्वच जनतेत नाराजी असेल
अशा वेळी सत्ताधारी पक्षाच्या विरोधी लोकमत तयार
होते. हेच लोकमत आपल्या भावना मतदानपेटीतून
व्यक्त करते तेव्हा मतदाराच्या प्रतिक्रिया शासन विरोधी
आहे. असे मत व्यक्त केले जाते.

11) उमेदवाराची लोकप्रियता :-
एखाद्या उमेदवाराचे मतदार संघातील जनतेशं
असलेले संबंध, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याने लोकहितासाठी
केलेले कार्य इत्यादी घटकापासून उमेदवाराची जनतेत लोक-
प्रियता वाढत असते. या लोकप्रियतेला जनता मतपेटीतून
समर्थन देते. परंतु उमेदवाराची प्रतिमा जर नकारात्मक
असेल तर मतदाराचे वर्तन बदलू शकते.

12) अज्ञान :-
मतदारांच्या अज्ञानाचा फायदा राजकीय पक्ष,
सामाजिक संघटना, दहशतवादी घेताना दिसतात. अशा
अज्ञानी मतदारांना जात, धर्म, प्रदेश आणि अनेक
भावनिक मुद्द्यांच्या आधारे आपल्याकडे आकर्षित केले
जाते. निवडणूकीत अज्ञानी लोकांचा सहभाग लोकांमध्ये
बऱ्यापैकी असतो. अयोग्य उमेदवाराला मतदान केल्यामुळे
काय परिणाम होतात हे समजून घेण्याइतपतची चिकित्सक
दृष्टी अज्ञानी मतदाराकडे नसते. अशा अज्ञानी मतदारांन
पैसा, दारु, अशा अनेक गोष्टींचे अमीष दाखवून
स्वतः साठी मतदान करून घेतले जाते.
वरील प्रमाणे मतदाराच्या वर्तणूकीला प्रभावित
करण्याचे काम अनेक घटक करतात.

Q.2 * राज्य निवडणूक आयोगाची रचना सांगून अधिकार स्पष्ट करा.

→ जी. एच. सहारीया हे राज्य निवडणूक आयुक्त आहेत लोकशाहीत आणि निवडणूका यांचा जवळचा संबंध आहे. लोकशाहीत मतदारांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण असते. भारताने स्वातंत्र्यानंतर प्रातिनिधिक लोकशाहीचा स्विकार केला या लोकशाहीत जनतेने निवडलेले जनतेच्या वतीने राज्यकारभार चालवतात. लोकप्रतिनिधी लोकांनाच जबाबदार असतात. निपक्ष पद्धती निवडणूका होणे उत्तम लोकशाहीचे प्रतिक आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पंधराव्या भागात कलम 324 ते 329 मध्ये निवडणूक आयोगाची सविस्तरपणे तरतूद केली आहे. या तरतूदी राज्यांसाठी स्वतंत्र निवडणूक आयोग असावे अशी तरतूद केली नव्हती याचा अर्थ स्वातंत्र्यानंतरच्या बऱ्याच निवडणूका केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत घेण्यात आल्या.

73 व्या व 74 व्या घटना दुरुस्ती द्वारे शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक स्थान देण्यात आले. शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका सुरक्षीत पार पाडाव्यात म्हणून संविधानातील कलम 243 (K) मध्ये राज्यस्तरावर एक निर्वाचन आयोग असेल या निर्वाचन आयोगामार्फत शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होतील याचा आधार घेऊन महाराष्ट्र शासनाने 1994 ला राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली.

* राज्य निवडणूक आयोगाची रचना :-
राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्य आयु

यांची नेमणूक त्या राज्याचा राज्यपाल करतो. १९९४ साली देवराम चौधरी यांची राज्याचे पहिले निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली सध्या जी. एच. सहारिया हे राज्य निवडणूक आयुक्त आहेत.

राज्याच्या मुख्य निर्वाचन आयोगपदी नेमणूक होणारी व्यक्ती सेवेतील ज्येष्ठ व अनुभवी अधिकारी असावी. तसेच तो / ती निपक्षपाती व चारित्र्य संपन्न असावी असा संकेत व अपेक्षा असते.

राज्य निवडणूक आयुक्ताला स्वतंत्र दर्जा देण्यात आला. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला ज्या पद्धतीने राज्यमुख्य निव पदावरून बडतर्फ केले जाते अगदी त्याच पद्धतीने राज्यमुख्य निवडणूक आयुक्ताला पदावरून बडतर्फ केले जाते म्हणजेच गैरवर्तन, भ्रष्टाचार, राष्ट्रद्रोह किंवा संविधान विरोधी कृत्य केल्यास निवडणूक आयुक्त, संसदेने मंजुर केलेल्या ठरावाने राष्ट्रपतीमार्फत बडतर्फ केले जाते.

राज्यातील निवडणूकांचे नियोजन राज्य निवडणूक आयोगाच्या सचिवालयामार्फत केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका या आयोगाला मदत करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा निवडणूक अधिकारी नियुक्त केला जातो. साधारणतः हे पद जिल्हाधिकाऱ्याकडेच असते. तसेच साहाय्यक नोंदणी अधिकारी हे पद तहसीलदाऱ्याकडे जाते. याशिवाय प्रत्येक मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी असतो. आवश्यक कर्मचारी वर्ग राज्यशासनाच्या सेवेतील नौकरी नोकरवर्गातूनच आवश्यकतेनुसार नियुक्त केला जातो.

संविधानातील कलम ३२९ नुसार न्यायालयांना राज्य निर्वाचन आयुक्ताच्या कामकाजात हस्तक्षेप करता येत नाही.

* राज्य निवडणूक आयोगाचे कार्य :
भारतामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्ती मार्फत राज्यनिवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना यशस्वी करण्यात राज्य निवडणूक आयोगाची भुमिका महत्त्वाची आहे निवडणूकीतून होणारा लोकांचा सहभाग व लोकमत स लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी महत्त्वपूर्ण असते. राज्य निवडणूक आयोग स्थापन झाल्यापासून खालील कार्य करत आहे.

1) स्थानिक स्वराज्य संस्थातील निवडणूका घेणे.
2) स्थानिक स्वराज्य संस्थेतील मतदार संघ निर्माण करून त्याची निश्चिती करणे लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधीची संख्या निश्चित करणे.
3) अठरा वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक ~~स्त्री~~ स्त्रि-पुरुषाच्या नावाची नोंद करून मतदार याद्या तयार करणे.
4) तयार केलेल्या मतदार याद्या प्रसिध्द करणे.
5) मतदार याद्या तयार करण्यासाठी आवश्यक कर्मचारी नेमणे.
6) मतदार याद्या दुरुस्त करून पुन्हा प्रसिध्द करणे.
7) मतदार याद्यातील मृत व्यक्तिची नावे वगळणे.
8) दोन ठिकाणी नाव असणाऱ्या मतदारांना नोटीस पाठवून एकाच मतदार संघात नाव ठेवण्यास सुचविणे.
9) मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करणे.
10) पंचायत राज्यव्यवस्थेतील सर्व संस्थाच्या निवडणुकीचा कार्यक्रम तयार करणे.
11) निवडणूक कार्यक्रम घोषित करणे.
12) आवश्यकतेनुसार पंचायत राजसंस्थामध्ये पोटनिवडणूका घेणे.
13) घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूका पार पाडणे.

14) निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याप्रमाणे उमेदवारांचे उमेदवारी अर्ज स्विकारणे.

15) उमेदवारी अर्जाची छाननी करणे.

16) उमेदवारी अर्जापैकी चुकीची माहिती भरलेले व अपुर्ण माहिती भरलेले अर्ज रद्द करणे

17) योग्य उमेदवाराचे अर्ज व त्याची यादी घोषित करणे

18) निवडणूकीसाठीच्या आवश्यक मतपत्रिका मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन मतदान केंद्रास पुरवठा करणे.

19) मतदान केंद्रावर आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

20) निश्चित केलेल्या तारखेला मतदान सुरक्षीत होईल याची खबरदारी घेणे.

21) मतदानाच्या दिवशी आवश्यकती सुरक्षा व बंदोबस्त पुरविणे.

22) निवडणूक आचार संहितेचे पालन सर्व उमेदवार व राजकीय पक्षाकडून केले जाते का? हे तपासणे.

23) मतदानाच्या समाप्तीनंतर सर्व मतपेट्या किंवा मतदान मशीन यांचे तालुक्याच्या ठिकाणी व्यवस्थित संकलन करणे.

24) मतमोजणीच्या दिवशी पारदर्शकपणे मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण करणे.

25) मतमोजणी नंतर प्रत्येक उमेदवाराला किती मत पडले हे जाहीर करणे.

26) सर्वात जास्त मते प्राप्त झालेल्या उमेदवाराला विजयी घोषित करणे.

27) एखाद्या उमेदवाराच्या विनंतीवरुन फेर मतमोजणी करणे.

28) मतदार केंद्र निहाय मतदानाची आकडेवारी जाहीर करणे
29) विजयी उमेदवाराला विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देणे
30) पंचायत राज संस्थांच्या निवडणुकीत गैरप्रकार घडल्यास (मतदान यंत्राची पळवापळव, बोगस मतदान) निवडणूक रद्द करणे.
31) निवडणूक रद्द करणे. पोट निवडणूक घेणे (निवडून आलेल्या प्रतिनिधींचा मृत्यू झाल्यास, त्याने राजीनामा दिल्यास किंवा त्याची निवड अवैध घोषित केल्यास) त्या जागेवर 6 महिन्याच्या आत पोट निवडणुका घेतात.
32) पंचायत राजव्यवस्थेतील मतदार संघाचे आरक्षण घोषित करणे.
33) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला निवडणूक चिन्ह देणे.
34) याशिवाय उमेदवाराच्या पात्रता व अपात्रते संबंधी वाद निर्माण झाल्यास राज्यपालांना सल्ला देणे.
35) निवडणुकांची आचारसंहिता तयार करणे.
36) निवडणूक याचीके संबंधी शासनाला आवश्यक सूचना देणे.
37) मतदान जागृती अभियान राबवणे.

वरील प्रमाणे सर्व कार्य राज्यनिवडणूक आयोगाला करावी लागतात. कारण भारतीय राज्यघटनेने राज्यनिवडणूक आयोगाला तसे अधिकार दिलेले आहेत.